**महामुंबई शिक्षण संस्था संघटना, मुंबई : शैक्षणिक वाटचाल**
**अहवाल – जानेवारी २०२६**

मुंबई महानगर परिक्षेत्रातील शिक्षणसंस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी, शैक्षणिक कार्याची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी व शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी १९८५ पासून सहयोगी शिक्षणसंस्था व संचालक सदस्य यांच्या सहकार्याने गुरुवर्य स्वर्गीय श्री. प. म. राऊत सर यांच्या अध्यक्षतेखाली 'महामुंबई शिक्षणसंस्था संघटना, मुंबई' ची स्थापना करण्यात आली. आजमितीस सुमारे १५१ शिक्षणसंस्था संघटनेच्या सभासद आहेत. कार्यक्षेत्रातील महानगरपालिका शिक्षण विभाग, राज्यशासनाचे शिक्षण विभाग व खाजगी शैक्षणिक संस्था यांच्यात सुसंवाद राखून खाजगी शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधित्व करून शैक्षणिक उद्दिष्टांचा घटक संस्थांच्या विविध उपक्रमांद्वारे व स्वतंत्रपणे पाठपुरावा करणे हा महामुंबई शिक्षण संस्था संघटना, मुंबई या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे.
सन १९८५ साली प्राथमिक शाळांच्या दोन वर्षे थकीत अनुदानाच्या प्रश्नाने संघटनेच्या कार्याची सुरुवात झाली आणि संघटनेच्या तत्कालीन कार्यकारिणीच्या पुढाकाराने मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे दाद मागितल्यावर चर्चेअंती प्रश्न मार्गी लागला. त्याउपरांत महामुंबई शिक्षण संस्था संघटना, मुंबई विभाग व राज्यातील खाजगी शिक्षणसंस्थांचे प्रश्न शासन दरबारी व समाजापुढे मांडून ते सोडविण्यास प्रयत्नशील राहिली. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाची मुंबई विभागीय संलग्न संस्था म्हणून संघटना आजतागायत कार्यरत आहे. सध्या संघटनेचे काही पदाधिकारी महामंडळाच्या कार्यकारिणीत कार्यरत असून शिक्षणक्षेत्रातील विविध समस्यांच्या समाधानाकरिता महामंडळाच्या राज्यस्तरीय बैठका, आंदोलने, निषेध सभा, शासकीय सभा अशा अनेक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होत असतात. राज्यातील शिक्षणसंस्थांपुढील अनेक समस्यांच्या निराकरणासाठी महामुंबई शिक्षण संस्था संघटना न्यायालयीन प्रकरणांमध्ये महामंडळाला सनदशीर मार्गाने सर्वतोपरी सहाय्य करीत आहे.

**महामुंबई शिक्षण संस्था संघटनेने आजवरच्या वाटचालीत, पुढील महत्वाचे शैक्षणिक विषय मार्गी लावले आहेत.**

१. १९८५ साली संस्थेने दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात भव्य मुंबईस्तरीय अधिवेशनाचे यशस्वी आयोजन केले होते, त्यात शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात आले. मोठया प्रमाणात शाळा व संस्था सहभागी झाल्या होत्या.
२. १९९५ साली मुंबईतील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पालिकेने थेट बँकेतून वेतन द्यावे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन मिळावे म्हणून शिक्षकांनी केलेल्या संपाला सक्रिय पाठींबा देऊन सदर मागणी मान्य करून घेतली. मुंबईसाठी शासनाकडून मिळणारे शिक्षण अनुदान २० टक्क्यांवरून ५० टक्के करून घेतले.
३. सन १९९५ साली शासनाच्या पूर्वप्राथमिक शाळेतील प्रवेशाविषयी शिक्षणसंस्थांना त्रासदायक ठरेल अशा कायद्याबाबत संस्थाचालकांची बाजू सातत्याने शासनासमोर मांडून संस्थेने या कायद्याची अंमलबजावणी स्थगित करून घेतली.
४. मुंबईतील खाजगी प्राथमिक शाळांसाठी महापालिकेने तयार केलेल्या अनुदान संहितेसाठी संस्थाचालकांचे मत विचारात घेतले गेले नव्हते. संघटनेने शासनाकडे याबाबत आक्षेप नोंदवून, नवीन सुधारित अनुदान संहिता तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये संघटनेच्या चार सदस्यांना सामावून घेऊन संस्थाचालक व इतर संबंधित घटक यांच्या सूचना विचारात घेऊन तयार झालेल्या सुधारित अनुदान संहितेस महापालिका व शासनाकडून मंजुरी

मिळविली. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुधारित अनुदान संहितेची अंमलबजावणी अद्याप केलेली नाही.

५. संघटनेचे माजी अध्यक्ष गुरुवर्य स्वर्गीय श्री. राऊत सर यांच्या मार्गदर्शनाने व पुढाकाराने प्राथमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी "बृहन्मुंबई खाजगी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित"या पतपेढीची स्थापना केली गेली.

६. खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे सन २००१ पासून बंद केलेले वेतनेतर अनुदान मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ या संस्थेचे तत्कालिन अध्यक्ष स्वातंत्र्यसेनानी स्व. गोविंदभाई श्रॉफ यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र लढा देऊन सर्व अनुदानित शैक्षणिक संस्थांना सन २००४ पर्यंतचे थकित वेतनेतर अनुदान अदा करून घेण्यात यश मिळवले.

७. शिक्षकांच्या नेमणुकांना मंजुरी, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, सन २०१२ पासून अंशत: मिळणारे वेतनेतर अनुदान, आरटीई कायद्यातील जाचक अटी आदींबाबत संघटनेने वेळोवेळी शासन स्तरावर आवाज उठविला.

८. शालेय शिक्षण विभाग व उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याशी सातत्याने सुसंवाद साधण्याचे व संस्थाचालकांची बाजू मांडण्याचे कार्य ही संघटना अविरतपणे करीत आहे. शिक्षणसंस्थांना अडचणीच्या वेळी सहकार्य करणे हा संघटनेचा मुख्य हेतू आहे. वेळोवेळी भेटीगाठी घेऊन व चर्चा करून संस्थाचालक व शिक्षणखाते यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न संस्था सातत्याने करीत आहे.

९. महामंडळाच्या होणाऱ्या सभांना संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहतात. शिक्षकांना व संस्थाचालकांना मार्गदर्शन करण्यास संघटनेकडून अनेकदा विभागीय सभांचे आयोजन केले जाते आणि संस्थांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जातात.

१०. संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे संस्मरणीय असे सोळावे राज्यव्यापी अधिवेशन मुंबईतील विक्रोळी येथील विकास हायस्कूलच्या प्रांगणात दिनांक ३ व ४ मे २००१ रोजी अत्यंत यशस्वीपणे आयोजित करण्यात आले होते.

११. बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभागाकडून अनुदानित प्राथमिक शाळांना एकूण विद्यार्थ्यांच्या शाळा शुल्काच्या रकमेपैकी १/१२ शुल्काची रक्कम मनपा तिजोरीत जमा करणेबाबत केली जात असलेली सक्ती संघटनेच्या पाठपुराव्यामुळे रद्द होऊन इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जाण्याची पद्धत २०२२ सालापासून बंद करण्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे व कार्यवाही सुरु आहे.

१२. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतीमधील मराठी व प्रादेशिक माध्यमाच्या खाजगी अनुदानित शाळांच्या वापरातील वर्गखोल्यांसाठी दरवर्षी १०% वाढीने अग्रिम स्वरूपात आकारल्या जाणाऱ्या भाडेपट्टी धोरणाला ऑक्टोबर २०२३ पासून ५ वर्षाकरिता मान. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मान. आयुक्त म.न.पा. मुंबई यांनी स्थगिती दिली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

१३. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सन२००१ ते २०२२ पासून प्रलंबित असलेले वेतनेतर अनुदान प्राप्त करून घेण्यात यश.

१४. प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगासाठी महानगरपालिका व शासनाकडे केलेला पाठपुरावा यशस्वी होऊन सातवा वेतन आयोग लागू केला गेला. आता थकबाकीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

**काही प्रमुख समस्या :**

१. सन २०००-२००१ व त्यापूर्वीच्या मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांच्या अनुदान तत्वावर आलेल्या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांचे टप्पा वेतन अनुदान.
२. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संचमान्यता व रिक्त पदे भरण्याकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" मिळविणे व शासनाने सुरु केलेल्या शिक्षकभरतीसाठी पवित्र पोर्टलच्या नियमावली विरुद्ध महामंडळासोबत मान. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ स्तरावर लढा देण्यात येत आहे.
३. शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षकांची उपलब्धता निश्चित करण्यासाठी मराठी माध्यमाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि अनुदानित उच्च माध्यमिक शाळा येथील सेवानिवृत्तीमुळेरिक्त झालेल्या पदांवर अध्यापनासाठी अतिरिक्त ठरलेले शिक्षक उपलब्ध करून देणे.
४. उच्चशिक्षण विभागाशी संबंधित महाविद्यालये आणि विशेषतः रात्र महाविद्यालयांच्या वेतन व वेतनेतर अनुदानाची नियमित आकारणी, पदभरणा, पदमान्यता तसेच ना हरकत प्रमाणपत्रांसाठी होत असलेला विलंब, प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी, प्रवेश केंद्रांतील आसनक्षमतेचे प्रश्न, समाजकल्याण विभागाकडे असलेली फी व शिष्यवृत्तीची थकबाकी, विद्यापीठ व उच्च शिक्षण विभाग मुंबई यांच्याफी मंजुरीतील तफावत आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणींचा शासनाकडे पाठपुरावा करणे.
५. अनुदानित शाळा व महाविद्यालयांच्या इमारतींना व्यावसायिक दराने मालमत्ता कर आकारणी धोरण रद्द करणे.
६. ९४ प्राथमिक शाळांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्नमार्गी लावण्यास महानगरपालिका व शासन यांच्याकडे मा. आयुक्त, म.न.पा यांचेकडे पाठपुरावा करून वेतन प्रश्न मार्गी लावला.
७. अनुदानित शाळा व महाविद्यालये यांना व्यावसायिक दराने आकारणी करण्यात येणारे वीजशुल्क दर कमी करणे.
८. खाजगी प्राथमिक शाळांसाठी म.न.पा. च्या जाचक पुनर्मान्यता अटी रद्द करणे.
९. शासकीय परिपत्रकांचा भडीमार.
१०. राज्यशासन आणि संस्थाचालकांच्या समन्वयाचा अभाव.
११. महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीसाठी NOC / ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत उच्च शिक्षण विभागाकडे पाठपुरावा.
१२. शिक्षकांना शिक्षणबाह्य कामाला जुंपणे.
१३. इंग्रजी माध्यमाच्या एस.एस.सी. बोर्ड, राष्ट्रीयबोर्ड, आंतरराष्ट्रीय बोर्ड संलग्न शाळांच्या समस्या व अडचणी शासनाकडे मांडणे व इंग्रजी संस्थांचे संचालक संघटनेमध्ये सदस्य म्हणून समाविष्ट करणे.
१४. आरटीई लागू असणाऱ्या शाळांच्या विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीसाठी पाठपुरावा सुरु आहे.
१५. खाजगी अनुदानित शाळांचे 'ए' व 'बी' फॉर्म तपासून वेतनेतर अनुदान व भाडे प्रतिपूर्ती करणे.
१६. सुधारित खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा संहिता लागू करणे.
१७. वरिष्ठ महाविद्यालयांसाठी विकास निधीमध्ये वाढ करावी.
१८. अल्पसंख्यांक व स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करणे.
१९. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्याशर्ती) विनियमन अधिनियमात काळानुरूप बदल करणे.
२०. संचमान्यतेच्या शासननिर्णया संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणे.

महामुंबई शिक्षण संस्था संघटना व महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्था महामंडळ यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय अधिवेशन दि. १ मार्च २०२५ रोजी महामुंबई शिक्षण संस्था संघटना मुंबई व ठाणे विभागाच्या वतीने आयोजित केले होते सदर अधिवेशनामध्ये खालील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले व त्याबाबत भविष्यात पाठपुरावा करण्यात यावा याबाबत निर्णय घेण्यात आला.

अधिवेशनात राज्यभरातून शैक्षणिक संस्था पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी, राज्यातील शैक्षणिक धोरणांवर थेट चर्चेसाठी अधिवेशनाने एक प्रभावी व्यासपीठ निर्माण केले, पुढील अधिवेशन दोन दिवसांचे असावे अशी एकमुखी मागणी.

- हे अधिवेशन महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांच्या मागण्या, समस्या आणि विकासाच्या संधी यांचे केंद्रबिंदू ठरले. शालेय व उच्च शिक्षणातील तांत्रिक व धोरणात्मक प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. पुढील काळात शासनाच्या धोरणांमध्ये शिक्षणसंस्थांची भूमिका भागीदार म्हणून वाढावी, या दिशेने अधिवेशनाने.
- खासदार सुप्रिया सुळे: गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक शिक्षणाची गरज अधोरेखित. शाळांना अधिक स्वायत्तता, सरकारी हस्तक्षेप कमी करण्याचे आवाहन. शिक्षणात ए.आय. चा सकारात्मक वापर आणि सावधगिरी. शिक्षकांची व विद्यार्थीची सुरक्षा यावर भर.
- मा. मंत्री, श्री. उदय सामंत: मराठी भाषा दिन सर्व शिक्षणसंस्थांमध्ये साजरा करण्याची गरज. कोविड काळातील संस्थांचे सहकार्याबद्दल गौरव.
- विधान परिषद सदस्य मान. डॉ. मनीषा कायंदे: SQAAF व सीएमश्री योजनेचा आढावा. शिक्षणाच्या समस्या मांडण्यासाठी तारांकित प्रश्नांची शिफारस.
- विधान परिषद सदस्य तथा शिक्षक आमदार मुंबई व कोकण विभाग मा, ज. मो. अभ्यंकर आणि मा. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे: संस्थांच्या विविध प्रश्नांवर शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन.

**महत्वाचे ठराव व कृती प्रस्ताव**

- **महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्था महामंडळाच्या वतीने पुढील ठराव मांडले गेले.**

प्रमुख ठराव:

१.पवित्र पोर्टलवरील बेकायदेशीर नेमणुका रद्द कराव्यात.

२ वेतनश्रेणीबाह्य अनुदानासाठी रु. २५०० कोटी निधीची मागणी.

३. शिक्षणसंस्थांना मालमत्ता कर सवलत.

४. **शाळांमध्ये** लिपिक व शिपाई पदे कायम करावीत.

५.इंग्रजी माध्यम शाळांसाठी स्वतंत्र शाळा संहिता तयार करणे.

६. बिंदूनामावली जिल्हानिहाय समितीद्वारे मंजूर करणे.

७. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी भरती प्रक्रिया सुलभ करणे.

८. **शिक्षकांसाठी** विविध विषयांवर सत्र व चर्चासत्रे

९. संचमान्यता, RTE शुल्क **प्रतिपूर्ती**, शिक्षकांचे समायोजन.

१०.शाळांवरील मालमत्ता कर व जल-वीज देयके.

११. शाळांची सुरक्षा व महिला कर्मचारी नियुक्ती.

१२. AI व तंत्रज्ञानामुळे होणारे शिक्षणातील बदल.

**महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने उच्च पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, विधान परिषद तथा विधानसभा सदस्य आणि मा. मंत्रिमहोदयांना दिलेली निवेदने -**

१. मा. शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन व मा. आयुक्त, शालेय शिक्षण विभाग यांना निवेदन सादर करून RTE Act, 2009 च्या कलम 19 (अ) (Chapter IV) अन्वये शिक्षकांचे किमान कामाचे दिवस व अध्यापन तास निश्चित असल्याने इयत्ता १ ली ते ९ वी साठीच्या 'Periodic Assessment Test (PAT)' परीक्षांच्या आयोजनाबाबत पुनर्विचार करून त्या राज्यातील शाळांच्या विद्यमान नियतकालिक परीक्षांच्या वेळापत्रकाशी सुसंगत ठेवण्याची मागणी केली आहे.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा. शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री यांना निवेदन सादर करून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतींतील मराठी माध्यमाच्या खाजगी शाळा व संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांसाठी भाडेतत्त्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांच्या भाडेवाढीवरील स्थगितीची अंमलबजावणी करावी तसेच नाममात्र भाडे आकारण्याबाबत मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

३. मा. शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री, महाराष्ट्र शासन यांना निवेदन सादर करून शिक्षण संस्थांच्या प्रलंबित प्रमुख मागण्यांबाबत बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. यात मालमत्ता कर, वीजदर व निवासी दराने वीज आकारणी, सौरऊर्जा सुविधा, शाळा मान्यता कायमस्वरूपी करणे, RTE शुल्क प्रतिपूर्तीची थकबाकी, रिक्त पदे भरणे, काळानुरूप MEPS नियमावलीत सुधारणा, BMC शालेय इमारतींतील भाडेवाढीवरील स्थगितीची अंमलबजावणी, खाजगी प्राथमिक शाळांचे अनुदान व सर्व अनुदानित शाळांचे थकीत वेतन अनुदान तातडीने देणे या मुद्द्यांचा समावेश आहे.

४. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना राज्यातील खाजगी महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे. तसेच मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांना पवित्र प्रणालीद्वारे सुरू असलेल्या शिक्षक भरती (टप्पा–२) दरम्यान जाहिराती मागे घेतल्याने आणि काही कनिष्ठ महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची संच मान्यता प्रलंबित राहिल्यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण न झाल्याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

५. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. आमदार श्री प्रवीण दरेकर तसेच कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार मा. श्री ज्ञानेश्वरजी म्हात्रे यांना मुंबई व ठाणे विभागातील शैक्षणिक प्रलंबित मागण्या व समस्यांबाबत शालेय शिक्षण मंत्रीमहोदयांसोबत बैठक आयोजित करण्यासाठी निवेदन सादर करण्यात आले आहे.

६. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०९.०६,२०१५ च्या शासन निर्णयानुसार व मा. शिक्षण मंत्र्यांच्या सूचनांन्वये शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याबाबत दिलेल्या आदेशांच्या पार्श्वभूमीवर,

महामंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधींनी शाळेत येऊ नयेत व शाळा बंद ठेवण्याच्या निर्णयाबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे.

७. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने लोकसभा, विधानसभा, स्थानिक प्राधिकरण व महानगरपालिका निवडणुकांसाठी बी.एल.ओ. पदासाठी शिक्षकांच्या सेवा अधिगृहीत करण्याबाबत निर्गमित आदेश रद्द करण्यात यावेत, यासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. शालेय शिक्षण व क्रीडा मंत्री तसेच मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे.

८. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतींमध्ये दिवसा सुरू असलेल्या मराठी माध्यमांच्या खाजगी शाळा व संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांसाठी भाडेतत्त्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांवरील भाडेवाढीस तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी दोन वेळा दिलेल्या स्थगितीची अंमलबजावणी व्हावी यासाठी मा. महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई, मा. शालेय शिक्षण मंत्री श्री दादाजी भुसे तसेच मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे.

९. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागू झालेल्या इयत्ता ११ ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशांबाबत निर्माण झालेल्या संदिग्धता व अडचणी दूर करण्यासाठी मा. विधान परिषद सदस्य श्री निरंजन डावखरे तसेच मा. शालेय शिक्षण मंत्री श्री दादाजी भुसे यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

१०. महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या वतीने माननीय आयुक्त शालेय शिक्षण विभाग यांना विकसित महाराष्ट्र २०४७ संदर्भात प्रस्तावित विजन डॉक्युमेंट सादर करण्यात आलेले आहे यामध्ये प्रामुख्याने --

- पाठांतराऐवजी चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता व सर्जनशीलता यांवर भर देण्याची गरज
- झोपडपट्टी, आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साधने, इंटरनेट व वीज उपलब्धतेचा अभाव
- अनेक पालकांची आर्थिक मर्यादा असल्याने AI व वैयक्तिकृत शिक्षणास पाठबळ देणे कठीण
- शिक्षक प्रशिक्षण व कामाच्या ओझ्याच्या मर्यादा, विशेषतः अनुदानित नसलेल्या व खासगी शाळांमध्ये
- स्मार्ट वर्ग, स्वच्छता, वीज, पाणी आदींसाठी भक्कम पायाभूत सुविधा व निधीची आवश्यकता
- Foundational Literacy & Numeracy (FLN), टॅबलेट्स व बॅगलेस शाळांच्या अंमलबजावणीत अडचणी
- गुरुकुल पद्धतीतील समग्र शिक्षण व आधुनिक वेळापत्रकाधारित शिक्षण यांतील तफावत
- समावेशन व समता: SC/ST/OBC, अल्पसंख्याक व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष अडथळे
- २०१३ नंतर नवीन शिक्षक भरतीतील विलंब व ‘पवित्र पोर्टल’ची मर्यादित परिणामकारकता
- निधी, पारदर्शकता, समुदाय सहभाग व आजीवन शिक्षण व्यवस्था या मोठ्या आव्हाने.

११. पवित्र पोर्टल विरोधात न्यायालयीन कार्यवाही प्रस्तावित आहे.

१२. संस्थाचालकांच्या वतीने दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी विविध शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्यासाठी एक संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीदरम्यान मुंबई व उपनगर क्षेत्रातील शाळा विश्वस्तांची एक व्यापक बैठक आयोजित करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावित बैठकीचा मुख्य उद्देश संयुक्त बैठक आयोजित करण्याच्या प्रस्तावासंदर्भात शाळा विश्वस्तांमध्ये सर्वसमावेशक व व्यापक एकमत निर्माण करणे हा होता.

या बैठकीत सर्व शाळा व्यवस्थापन संघटना, महामुंबई शिक्षण संस्था संघटना, ए.बी. समूह तसेच मुंबई महानगर प्रदेश (MMR) अंतर्गत कार्यरत इतर शाळा विश्वस्त संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

या बैठकीत फेब्रुवारी २०२६ मध्ये सीएसटी, मुंबई येथे एक महत्त्वाची संयुक्त बैठक आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्याअनुषंगाने, सदर संयुक्त बैठकीच्या पूर्वतयारीसाठी दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १:०० ते ४:०० या वेळेत चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटर स्कूल, यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०६१ येथे एक प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती.

तसेच, शाळा विश्वस्तांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा योग्य व्यासपीठांवर प्रभावीपणे पाठपुरावा करता यावा, या उद्देशाने शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे व निर्णयक्षम अधिकारी सहभागी करून घेण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला होता. यामध्ये मा. शिक्षण मंत्री, शिक्षक आमदार (विधान परिषद सदस्य), शिक्षण सचिव तसेच अन्य संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचा समावेश करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या माध्यमातून राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांसमोरील गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना व्हाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शासनातील संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मा. मुख्यमंत्री व मा. शिक्षणमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष भेटी घेऊन सविस्तर निवेदने सादर केली आहेत. तसेच हे प्रश्न विधानसभा, विधानपरिषद व पालिका सभागृहात मांडून शिक्षणक्षेत्रातील अडचणींच्या निराकरणासाठी संघटित व अविरत प्रयत्न सुरु आहेत. तसेच शिक्षणक्षेत्राचे सबलीकरण करण्यासाठी आणि बदलत्या जागतिक व सामाजिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर दर्जेदार शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी शैक्षणिक संस्थांना संघटित करून सातत्याने सजग व संयुक्त प्रयत्न सुरु आहे.


**डॉ. विनय प. राऊत**
कार्यवाह
(मो.9322493434)

**श्री. सदानंद रावराणे**
अध्यक्ष
(मो. 9869976304)

**महामुंबई शिक्षण संस्था संघटना, मुंबई**
द्वारा: विकास हायस्कूल, कन्नमवार नगर -२,विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०८३.